


**About Us: http://www.galaxyimrj.com/about-us/**
**Archive: http://www.galaxyimrj.com/archive/**
**Contact Us: http://www.galaxyimrj.com/contact-us/**
**Editorial Board: http://www.galaxyimrj.com/editorial-board/**
**Submission: http://www.galaxyimrj.com/submission/**
**FAQ: http://www.galaxyimrj.com/faq/**

# आदिवासी कथेमधून प्रकट होणारा विद्रोह

डॉ. एकनाथ आहेर
डांग सेवा मंडळ नाशिक, कला व वाणिज्य महाविद्यालय,
उंबरठाण ता. सुरगाणा,
जि. नाशिक- ४२२२११.

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये अनेक नवीन प्रवाह उदयास आले. त्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य प्रवाह यांचे स्वतंत्र दालन निर्माण झाले. मराठीतील अभिजात संस्कृतीचे मानदंड या सर्व साहित्यप्रवाहानी बाजूला सारून आपल्या समाजातील जीवनानुभव साहित्यात मुखर केले. आदिवासी साहित्य लेखनाला खऱ्या अर्थाने १९७५ नंतरहून सुरुवात झाली. शहरापासून कोसो दूर अंतरावर, डोंगरदऱ्यात राहणाऱ्या आदिवासी समाजापर्यंत स्वातंत्र्यानंतरही भौतिक सुख-सोयीसुविधा पोहचल्या नाहीत त्यामुळे शिक्षणापासून, तंत्रज्ञानापासून आणि प्रसारमाध्यमापासून हा समाज अनभिज्ञ राहिला. ह्या अज्ञानी जीवनात खितपत पडलेल्या समाजातील काही तरुणांना बाह्य जगातील घडामोडींची जाण होऊन त्यांनी आपली लेखनी हातात घेतली. “आदिवासी साहित्य हे वन संस्कृतींचे नातलग साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे साहित्य आहे. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत. अशा दुर्लक्षितांचे हे साहित्य आहे.”[१] मात्र ज्या लेखकांनी शहरी चष्म्यातून आदिवासी समाज जीवन शब्दबद्ध केले त्यात मात्र काहीसा उथळपणा, रंजकता व बेगडीपणा आलेला दिसून येतो.

आदिवासी लेखकांच्या पहिल्या सुशिक्षित पिढींनी लेखनी हातात घेतली त्यामध्ये अनेक नामवंत कवींनी ‘कविता’, कादंबरीकारांनी ‘कादंबरी’, कथाकारांनी ‘कथा’ अशा अनेक साहित्यप्रकारांना स्पर्श केला. अशात डॉ. गोविंद गारे, भुजंग मेश्राम, विनायक तुमराम, वाहरू सोनवणे, नजुबाई गावित, उषाकिरण आत्राम, बाबाराव मडावी, माधव सरकुंडे, डॉ. तुकाराम रोंगटे, डॉ. संजय लोहकरे, कवी तुकाराम धांडे, संजय दोबाडे, कवी मधुचंद्र भुसारे, कवी देवदत्त चौधरी अशी अनेक जुन्या आणि नव्या

पिढीतील आदिवासी साहित्याला समृद्ध आणि सकस करणाऱ्या साहित्यिकांचे नावे घेता येतील. अशा सर्वांनी आदिवासी साहित्याला परिवर्तनाच्या वाटेवर नेऊन ठेवले आहे.

आदिवासी समाज हा शांत व संयमी स्वभावाचा आहे. विनाकारण आपल्यामुळे कोणाला त्रास होईल असे न वागता सरळ, साध्या पद्धतीने जीवन जगत असतो. तो साक्षर नसल्यामुळे साक्षर व सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्या समाजापुढे सहज नमत असतो. त्यांच्या ह्याच प्रामाणिक स्वभावाचा फायदा उचलून त्यांची हेळसांड करणारे समाजात अनेक घटक दिसून येतात. आदिवासींच्या जमिनी बळकावून त्यांना भूमिहीन करणारा जमीनदार वर्ग, आपली नड भागविण्यासाठी सावकाराकडून उचललेल्या रकमेवर बेहिशोपी चक्रवाढ व्याज लावणारा सावकार, आदिवासी मजुरांच्या जीवावर पोसलेला ठेकेदार वर्ग किंवा बदुकीचा धाक दाखवून व वर्दीचा आव आणून आदिवासींच्या भगीनींवरच करडी नजर ठेवणारे वनरक्षक अशा कित्येकांनी आदिवासींना बेनकाब केले आहे, मात्र जेव्हा अन्याय व जुलूमामुळे आदिवासी माणूस डिवचला जातो, त्याला मनाविरूद्ध वागणूक देऊन घायाळ केले जाते, तेव्हा तो व्यवस्थेविरूद्ध विद्रोह पुकारतो. अन्यायाविरुद्ध प्रतिकार करतो व त्याचा दबलेला आवाज बुलंद करतो. आदिवासी कथा ह्या आदिवासी समाजातील शोषणावर बोट ठेवणाऱ्या, अन्यायाविरूद्ध पेटून उठणाऱ्या आहेत. 'अहेर', 'भाकर', 'नवसा भिलणीचा एल्गार', 'भोंगऱ्या' ह्या कथासंग्रहातील काही कथांमधून हा विद्रोह प्रकट होताना दिसतो.

'अहेर' ह्या कथासंग्रहातील सह कथा ह्या आदिवासी जीवनातील शोषण, अन्याय, दु:ख व्यथा वेदना यावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. 'अहेर' ही कथा वर्षानुवर्ष जमीनदार पेशव्यानी सुरू ठेवलेल्या 'अहेर' प्रथेच्या बदलेची कहाणी आहे.त्याचबरोबर अहेर कथासंग्रहातील गोंड समाजाचे सांस्कृतिक जीवन, अहेर प्रथेविरुद्ध मोट्यारिन दायीच्या प्रेरणेने रमी व सोमाने पुकारलेले बंड व जमीनदार पेशवाचा रमीने केलेला खून इत्यादी घटना वाचकांचे मन खिळवून ठेवतात. "क्षणभर पसरलेल्या भयग्रस्त शांततेला उजाळा देत मोट्यारिन दायी म्हणाली सोमा ! 'आरं तु वाघाचं तोंड आहेस 'खबरदार' घाबरलास तर त्या ससीच्या पिल्लाले', 'आरे आजवर लई नव्या नवरीले ह्यानं बाटवलं, अहेराच्या नावाखाली समद्या

गोंडनिले ह्याकुम्यान चाटलं बघा' देवधर्माच्या मोठेपणाच्या अहेराच्या नावाखाली 'आम्हा बायकांना नासवलं', 'कितीक कोरे आयेन ह्या रंडव्यानं फांडले! पण कोण हिशोब ठेवणार?. 'आरे, पोरांनो ! कालची अवस इसरा, नं घ्या कोयता हातात ! रमी! चल पोरी! आज तु चोळी काढली ना?- 'मग हो तैयार. उघाडा डर सांभाळाच्या लायकीची झालीस नं व?! मग बांध कमरेले पदर। 'नं घे हा कोयता'! 'त्याले अहेर दे तुहीं' 'म्हण। दे अहेर न, हा घे' "अहेराचा बदला अहेर"! भडव्या, माजोर डुकराचा माज उतरवूनच ये', 'आरे पोरांनो! पायता का? आरे हीच एक संधी आहे. 'समधे पेटून उठा'- 'घ्या पेरसापेनची शपथ"[२] चंद्रपूर, गडचिरोली ह्या भागात पूर्वीच्या काळी जमीनदारांनी रूढ केलेली ही 'अहेर' प्रथा. लग्न झाले की, नवरी मुलीला जमीनदारांच्या घरी जाऊन साडी चोळी देण्याची प्रथा होती. मात्र ह्या प्रथेच्या आडून नवविवाहित तरूणी पहिल्याच दिवशी जमीनदारांकडून लुटल्या जात होत्या. आदिवासींवरील हा अन्याय त्यांच्या डोळ्यासमोर होत होता. मात्र जमीनदारांची दहशत आणि जुलूमापुढे सर्वजण भयभीत होऊन जगत होते. परंतु ह्या अन्यायाचा कळस माडिया गोंड यांनी मोडून काढला. आदिवासींच्या गोटुलाची प्रमुख स्त्री मोट्यारीन दायी हिच्या हिंमतीने, ध्यैर्याने रमी व सोमा जमीनदारांविरुद्ध पेटून उठतात. अहेरच्या बदल्यात 'अहेर' असा बुलंद आवाज करून गोंड आदिवासींचा प्रमुख देव 'पेरसापेनची' शपथ घेतात. पिढ्यानपिढ्या आदिवासींना आपले गुलाम समजून त्यांचा उपभोग घेणाऱ्या जमीनदारांविरूद्ध उठाव करणारे आदिवासी गोंड माडिया क्रांती व विद्रोहाची भाषा करताना या कथेमधून दिसून येतात.

सावकारांनी आदिवासींची अडल्या नडल्याची गरज भागविली. मात्र त्यापाठीमागे त्यांची मतलबी व स्वार्थी वृत्ती त्यांनी कधीच सोडली नाही. आदिवासींवर अव्वाच्या सव्वा कर्जाचे बोज चढवून त्यांना वेठबिगार करणे, त्यांना भूमिहीन करून दिवसरात्र सावकाराच्या हातचे गुलाम करणे, कर्जाच्या व्याजापोटी घरातील सर्वांनाच सावकाराचा उंबरठा झिझवायला लावणे, तरीही गुमाणपणे सावकाराच्या धाकापोटी राबराब राबत राहणे, ही परिस्थिती आदिवासींबाबत सर्रासपणे दिसून आलेली आहे, मात्र कधी कधी शिक्षणाची एक ठिणगी सुद्धा संघर्षाला पुरक ठरते हे उषाकिरण आत्राम यांच्या 'बाजा' ह्या कथेतून समोर येते. "मी नाही येत जा कामाले, मी कां मोठा आहे का? 'आरं शिंच्या' लइ मस्तीले आला न बे- काव लक्षे तुवं हे टोंगरंभर तितीर नाही नं- माह्या तोंडाले तोंड देते नं- लेकाले फलकवूनच टाकान'

सावकार तरातरा आग पाखडत हाताची छापड घेवून पेन्टाच्या मागे धावला. तसाच पेंटा पळत म्हणाला- 'तु मारून तं पाय', 'माह्या मायबापाले मारलं तसं मले मारतो म्हणशील' 'तर मी ऐकून घेणार नाही', सावकार असशील आपल्या घरचा 'साऱ्या लोकायचं रगत पितो. लुबाडतो. 'आमच्याच रक्तावर पोकला नं तु 'थांब! थांब! 'मोठा तं होवू दे, तुले बी म्या घणचक्कर दावीनच थांब" (अहेर, पृ.क्र.२९) मुका बाजाचा मुलगा पेन्टा हा शाळेत जात असल्यामुळे त्याला आपल्या आईबापावर सावकाराने चालविलेल्या अन्यायाची जाणीव होते, बाजा ऐवजी पेन्टाला शेतात कामावर घेणाऱ्या सावकाराला हा चांगलाच धडा आहे. 'सावकार असशील तुझ्या घरचा' ही भाषा करणारा लहानसा पेन्टा परिवर्तनाचा, विद्रोहाचा म्होरक्या होतो. जोपर्यंत माणसाला अन्यायाची जाणीव होत नाही. तोपर्यंत माणूस अन्यायाविरूद्ध पेटून उठत नाही, त्याचा बदला घेत नाही. "माझ्या बापाला सावकाराने गडप केले." सर्वांचे लक्ष पेन्टाच्या हाकेकडे लागले. चला माझ्यासोबत सावकाराच्या वाड्यावर, लहानसा पेन्टा एखाद्या पेटत्या औंडक्यासारखा पेटून निघाला होता. वस्तीभर मुखियाने फुकार दिला. सारी वस्ती जवळपासच्या टोल्यावरची आदिवासी स्त्री-पुरूष लहान मोठे सावकाराच्या वाड्यासमोर गोळा झाले. वाड्याला लोकांनी घेरून टाकले. पेन्टा मुखिया, संबा, शिवा-ओरडले सावकार! घराबाहेर निघ ! सावकार बाजा कुठं आहे? वाड्यात काम करणारे सर्व 'नोकर बिगार पुढे या? कोणीही आज काम करायचे नाही. जो कोणी ह्या राक्षसाकडे यापुढे काम करेल त्याला पंचायत जातीबाहेर ठेवील. त्याच्याकडून दंड घेतला जाईल. दहा कोसाबाहेर हाकलून दिला जाईल. यापुढे सावकारांची, जमीनदारांची मनमानी चालणार नाही. कोणीही यापुढे वेठबिगार स्वीकारायची नाही. वेठबिगार बंद झाली पाहिजे." (अहेर, पृ.क्र. ३३) जो समाज वर्षांनुवर्षे सावकार, जमीनदार यांची चाकरी करीत होता. ज्याला सावकारांनी मुठीत आवळून जिवंतपणीच मरणयातना दिल्या होत्या, तो आदिवासी समाज सावकारांच्या अन्यायाविरुद्ध पेटून उठलेला दिसून येतो. एक दोन नाही तर सबंध समूहच सावकारांच्या या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी सज्ज होतो, अन्यायाविरूद्ध बंड पुकारतो. आदिवासींनी व्यवस्थेविरुद्ध, परंपरेविरुद्ध, दडपशाही विरुद्ध केलेला हा रणसंग्राम आहे. या व्यवस्थेने त्यांचा घात केलेला आहे. त्याविरुद्धचा हा बंड

आहे. एकजुटीच्या मशालीचा तो धागा बनतो. जिथं अन्याय होतो, तिथं कधीतरी, केव्हातरी अशा संघर्षमय कहाण्या उदयास येत असतात,याची साक्ष ही कथा देते.

बाबाराव मडावी यांच्या 'भाकर' कथेत बाज्याने सावकाराचा घेतलेला सूड हा क्रांतीचे, परिवर्तनाचे पाऊल टाकणारा आहे. जेव्हा सर्व यंत्रणाच बाजाच्या विरुद्ध असते तेव्हा सावकाराचा खूण करणे म्हणजे प्रतिशोध घेण्यासारखे आहे. "एक दिवस गंफ्या वाज्याला दमदाटी देवून म्हणाला- बाज्या तूयं आता हे वावरं राहयलं नायी. तू इथं कायला येतं? बाज्याचं शरीरातलं रक्त गरम होत गेलं डोळे लाल-लाल झाले. बाजाचा विद्रोह पेटला, त्यानं अंव्याच्या झाडाखालचा भला मोठा दगड दोन्ही हातानी वर उचलला अन् गंफू सावकाराच्या डोक्यावर उचलून टाकला. एकसारखा दगड उचलून गंफू सावकाराच्या डोक्यावर उचलून टाकू लागला. क्षणार्धात गुंफू मरून पडला तरी बाजा जोरजोरानं ओरडत त्याच्या अंगावर दगड टाकतच होता. मायी जन्माची भाकर छीनतं मुर्दाडा...!'[3] बायकोच्या बाळंतपणासाठी सावकारांकडून बाजाने पाचशे रूपये व्याजानं उचललेल्या रक्कमेवर सावकार पन्नास हजार रूपयाचे खोटे कर्ज लावून कोऱ्या स्टॅम्प पेपरवर अंगठा घेतो. 'ज्याला पाचशे रूपये कर्ज म्हणून घ्यावे लागते' तो पन्नास हजार कसा फेडणार म्हणून सावकार बाजाची जमीनच हडप करतो. याचा राग म्हणून बाजा सावकाराचा खून करून बदला घेतो. जो समाज आजपर्यंत सावकारांच्या पायाशी लोळण घालत होता. तो समाज सावकाराच्या अशा वागणुकीमुळे पेटून उठतो, सत्य काय ते साऱ्यांना ओरडून सांगतो. हा कित्येक दशकानंतर का होईना आदिवासी समाजातील विद्रोह त्यांना परिवर्तनाचा मार्ग दाखवितो.

'नवसा भिलणीचा एल्गार' या कथासंग्रहातील 'नवसा' ही व्यक्तिरेखा आहे. या कथेत ती विद्रोही व रोखठोक स्वभावाची पहावयास मिळते. गवताचा भारा घेऊन बाजारात जाऊन विकणे, त्यावर मीठ मिरची करून ती संसाराचा गाडा चालविते. तिच्या नवऱ्याकडून सततच्या छळाला ती वैतागते. तिची आंधळी सासू कमला नवसाला मूल नाही म्हणून तिला वांझोटी म्हणून हिनवते. नवऱ्याचा व सासूचा तिच्यावर रोष असतो. नवऱ्याच्या रोजच्या माराला व सासूच्या जाचाला वैतागूण नवसा विद्रोह करते. "अरे, कुणबट्यांच्या पोटचा, पोटकाठ्या, मी पवळू भिल्लाची, खऱ्या बिवाऱ्याची औलाद आहे.

अशा खोटारड्या माणसांबरोबर मी कसं जगावं ? माझ्या नादी लागलास, तर तुझ्या नरड्याचा घोट घेतेच मी"![४] असा संताप व्यक्त करून नवसा नवऱ्याला कायमचा रामराम ठोकते. नवऱ्याला व सासूला ठणकावून सांगणारी नवसा विद्रोही रूप धारण करते. माहेरी आल्यावर मोळी विकून ती आनंदात राहते. भिवसनबरोबर ती दुसरा संसार थाटते. वीस वर्ष सोबत असणाऱ्या भिवसनला मटका, जुगार, दारूची सवय जडते. नवसाच्या मेहनतीच्या पैशावर तो जुगार खेळतो हे समजल्यावर नवसा त्याच्यावर चवताळते, ती मनाचा ठिय्या करून कायमचा भिवसनला नाकारते व व्यवस्थेविरूद्ध एल्गार पुकारते. व्यवस्थेविरूद्ध आवाज बुलंद करणारी, विद्रोही व स्वाभिमानी स्वभावाची'नवसा भिलणीचा एल्गार' या कथासंग्रहातील 'नवसा' ही व्यक्तिरेखा दिसून येते.

अशा ह्या शांत व संयमी असलेल्या आदिवासी समाजाला आजवर अनेकांनी लुटले आहे, आपल्या हातचे बाहुले बनविले आहेत. त्यांना आपल्या इशाऱ्यावर नाचवून त्यांचे दमन केले आहे. मात्र त्यांच्यावरील अन्यायाचा अतिरेक झाल्यामुळे, त्यांच्यातील आत्मभानाने जागृत होऊन ते पेटून उठले. सावकार, जमीनदार, वतनदार यांच्या विरुद्ध केलेले बंड, विद्रोह हे आदिवासींच्या क्रांतीचे द्योतक असल्याचा पुरावा वरील कथा देतात.

## संदर्भ ग्रंथ

१.तुमराम विनायक, 'आदिवासी कथा: चर्चा आणि चिंतन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,

प्रथमावृत्ती २०१२, पृ.क्र. १

२. आत्राम उषाकिरण, ‘अहेर’, गोंडवाना- गोंडी साहित्य परिषद, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९६, पृ.क्र. १५

३. मडावी बाबाराव, ‘भाकर’, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २०१३, पृ.क्र.२६

४.गावित नजुबाई, ‘नवसा भिलणीचा एल्गार’, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१३.

पृ.क्र.७६